VCD.130423 FYBAMMC SEM II EFFECTIVE COMMUNICATION SKILL II 2½ HRS 75MARKS

**सूचना :** (१) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक.
(२) उजव्या बाजूचे अंक गुण दर्शवितात.

**प्रश्न १.** विवा कोलेजच्या बीएएमएमसी विभागातर्फे एक्स्प्रेशन २०२३ च्या प्रमोशन साठी फ्लॅशमॉब केला गेला. यासबंधी एक प्रसिद्धीपत्रक लिहा. **(१५)**

**प्रश्न २. (अ)** खालील उताऱ्यात व्याकरणाच्या चुका ओळखून उतारा पुन्हा शुद्धलेखनात पुन्हा लिहा. तुम्ही शोधून दुरुस्त केलेल्या चुकांच्या खाली एक ओळ देऊन अधोरेखित करा. **(१५)**

विकास आवश्यकच' पन पर्यवरणाचा बळी देऊन तो सधला जात असेल तर त्याला विकास म्हणायचा की विनाशाची सुरुवात?? भारताची वाटाचाल त्याच दिशेने चालल्याचे संकेत इंग्लंडस्थित 'युटिलिटी बीडर' या संस्थेने दिले आहेत. २०१५ ते २०२० या कळात भारताने साहा लाख ६८ हजार ४०० हेक्टरवरील जांगाल गमावले. गेल्या ३० वर्षातील ही सर्वाधिक जांगालतोड आहे...

परयावरण असंतुलन' 'हवामान बदलाचे दुष्परिणाम जागभरातील अनेक देशांना भोगावे लागत आहेत. भरात त्याहून वेगळा नाही. त्यांनंतरही केंद्रीय पर्यवरण, वने आणि हावमान बंदल मंत्रालयाने पर्यावरणाशी निगडित कायदे बादलाचा जो घाट घातला आहे, त्याचेच दुष्परिणाम अता समोर येत आहेत. या कयदेबदलांमुळे प्रकल्प वेगाने मार्गी लागत आहेत आणि तेवढ्याच वेगाने जगलदेखील तोडले जात आहे. साहा लाख ६८ हजार ४०० हेक्टरवरील जंगलतोड अवघ्या पाच वर्षात होणे, यावरूनच हे चित्र स्पष्ट होते. ब्राझील या देशानंतर जंगालतोडीच्या क्रमवारीत भरताचा दुसरा क्रमांक आहे.. ब्राझीलमध्ये या कालावधीत १६ लाख ९५ हजार ७०० हेक्टर वनक्षेत्र नहीसे झाले. या दोन्ही देशांच्या अकडेवारीने विकास की, पर्यवरण हा मुद्दा पुन्हा: एकदा उपस्थित झाला. आहे. एकीकडे हवामान बदलाचा सामना कसा करावा यासाठी जागतिक पातळीवर बैठका होतात. या बैठकांमध्ये कारार होतात आणि त्यावर वीविध देशांच्या सहया होतात. पण प्रश्न पुन्हा तोच! या करारातील बाबी किती लोक पाळतात? त्या पाळल्या असत्या तर इवढा मोठा विनाश दिसलाच नसता.'

मार्च २०२३ मध्ये प्रसिद्ध झालेल्या या आहावालात १९९० ते २००० आणि २०१५ ते २०२० या कलावधीतील जंगलतोडीचे विश्लेषण या संस्थेने 'डेटा ॲग्रीगेटर अवर वर्ल्ड इन डेटा'च्या मदतीने केले. गेल्या ३० वर्षांतील ९८ देशांतील जंगलतोडीचे विश्लेषण त्यान केले. १९९० ते २००० या कालावधीत भारताने तीन लाख ८४ हजार हेक्टर वनक्षेत्र गमावले. तर २०१५ ते २०२० या काळात सहा लाख ६८ हजार ४०० हेक्टरवरचे जंगल गमावले. म्हणजेच दहा वर्षांत जेवढी जंगलतोड भारतात झाली, त्यापेक्षा दुपटीने जंगलतोड पाच वर्षांत झाली, या दोन्ही कालावधीत जंगलाच्या विनाशात दोन लाख ८४ हजार ४०० हेक्टरची वाढ झाली. लोकसंख्येतही भारत जगात दुसऱ्या क्रमांकावर आहे आणि वढत्या लोकसंख्येचे परिणाम पर्यावरण विनाशाच्या स्वरूपात भोगावे लागत आहेत. लोकसंख्या वाढली की मणसाच्या गरजा वाढतात आणि त्या पुर्ण करण्यासाठी माणसाची धाव ही जंगालाकडेच असते, असेही मात या आहवालात नोंदवण्यात आले आहे.

munotes.in

किंवा

**(ब)** नोटीस म्हणजे काय? त्याची आवश्यकता का असते ते सांगा. (८)

**(क)** परीपत्रक म्हणजे काय? परिपत्रकाची रचना आणि लेखनशैली बद्दल सविस्तर सांगा (७)

**प्रश्न ३. (अ)** जागतिकीकरणामुळे युवा वर्गाची वृत्ती आणि संस्कृती यात बदल झाला आहे. याबदल एक विशेषलेख लिहा. (१५)

किंवा

**(ब)** पब्लिसिटी म्हणजे काय? त्याचे प्रकार सांगा. (८)

**(क)** संहितालेखन म्हणजे काय? जाहिरातीच्या संहिता चे विभाग सांगा. (७)

किंवा

**प्रश्न ४. (अ)** खालील उताऱ्यात मध्ये वाक्यांचा क्रम चुकेलेला आहे. तसेच काही वाक्य दोन वेळा आली आहेत. नीट वाचा आणि योग्य क्रमाने लिहा (१५)

सचिन सकाळी ५ वाजता उठतो. १० वाजता शाळेला जातो. नंतर आंघोळ करतो नंतर चहा नाष्टा करतो. प्रार्थविधी आटपून ६:३० वाजता जॉगिंग ला जातो. ४ वाजता घरी येतो. आईला कामात मदत करतो. नंतर अभ्यास करतो. आईच्या पाया पडतो. ५:३० वाजता मित्रासोबत क्रिकेट खेळायला जातो. हातपाय धुऊन आराम करतो. नंतर शाळेचा गृहपाठ करतो. रात्री ९:३० वाजता जेवण झाल्यावर सचिन झोपतो. टीव्हीवर बातम्या पाहतो. नंतर आंघोळ करतो. झोपण्यापूर्वी सकाळी पाच वाजण्याचा अलार्म लावतो. रात्री सचिन चे बाबा घरी आल्यावर त्यांना पूर्ण दिवसभराच्या गोष्टी सांगतो. आईच्या पाया पडतो. प्रार्थविधी आटपून ६:३० वाजता जॉगिंग ला जातो.

किंवा

**(ब)** सारांशलेखन म्हणजे मधले मधले शब्द गाळून लिहिणे नव्हे तर सारांशलेखन म्हणजे सार ओळखून लिहिणे होय. सविस्तर तुमच्या शब्दात सांगा. (८)

**(क)** लिखाण करताना तर्काला काय महत्व असते. (७)

**प्रश्न ५.** टिपा लिहा - कोणतेही तीन (१५)

**अ)** सांकृतिक वार्तांकन

**ब)** क्रीडा वार्तांकन

**क)** एडिटिंग कौशल्य

**ड)** इलेक्ट्रोनिक मिडिया साधने

**इ)** जोडशब्द

***

15

munotes.in